32

**(सोबत राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या शिखर समितीच्या दिनांक ९.६.२००४ रोजी झालेल्या पहिल्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत)**

**क्र.ग्रापापु १००४/प्र.क्र.९२/पापु.०७**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक-२१.६.२००४**

प्रति,
मा.मुख्य सचिवांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
मा.अपर मुख्य सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई.
मा.प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई.
मा.प्रधान सचिव (ग्राम विकास), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
मा.प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग), मंत्रालय, मुंबई.
राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या शिखर समितीचे सर्व सदस्य.
सह सचिव (श्री.दे.), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
उप सचिव (श्री.ठा.), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई
प्रकल्प व्यवस्थापक (जलस्वराज्य), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग.
राज्य प्रकल्प नियंत्रक, राज्य शिक्षण परिषद, मुंबई.
उप सचिव (श्री.जोशी), शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
उप सचिव (श्री.जाधव), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
सहसंचालक (डॉ.शेंडे), आरोग्य विभाग, पुणे.
उप सचिव (श्री.सुर्वे), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई.
राज्य स्वजलधारा कक्ष
निवडनस्ती पापु.०७

**(सुधाकर ज्ञा.बोबडे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

D:\year 2004\c.r.92-1004.doc

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग/पापु.०७

**विषय- "राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या" शिखर समितीच्या दिनांक ९.६.२००४ रोजी झालेल्या पहिल्या बैठकीचे इतिवृत्त.**

केंद्र शासन पुरस्कृत स्वजलधारा योजना व संपूर्ण स्वच्छता अभियान यांचे राज्य स्तरावरील संचालन, निधी वितरण, मार्गदर्शन, सनियंत्रण या बाबींच्या अनुषंगाने अपेक्षीत कर्तव्ये व जबाबदारी पार पाडण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या राज्य स्तरावरील "राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन" च्या "शिखर समिती" ची पहिली बैठक बुधवार दिनांक ९ जून, २००४ रोजी दुपारी ४.३० वाजता मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदर बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांची यादी सोबत जोडपत्र-१ म्हणून जोडली आहे.

२. बैठकीच्या सुरुवातीस "शिखर समितीचे" सदस्य सचिव व प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी स्वजलधारा योजना व संपूर्ण स्वच्छता अभियान कार्यक्रम याबाबतची माहिती सादरीकरणाव्दारे मा.अध्यक्षांना व उपस्थित सदस्यांना करुन दिली.

३. शासनाने नेमावयाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील ३ तज्ञांचा समावेश शिखर समितीमध्ये करण्यासाठी स्वतंत्र धारिका सादर करुन त्यावर शासनाची मान्यता घेण्यात यावी असा बैठकीत निर्णय घेण्यात आला.

४. तसेच, राज्य कार्यकारी समितीवर विविध क्षेत्रातील ६ तज्ञ नेमण्याचा प्रस्ताव तयार करुन त्यास शिखर समितीच्या अध्यक्षांची मान्यता घ्यावी व शिखर समितीच्या पुढच्या बैठकीत कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करावा असे ठरले.

मा.अध्यक्षांचे व उपस्थित सदस्यांचे आभार मानून बैठक संपली.

-----------------

## जोडपत्र-१

राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या शिखर समितीची पहिली बैठक बुधवार दिनांक ९.६.२००४ रोजी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदर बैठकीस शिखर समितीचे पुढील सदस्य हजर होते:-

| अ.क्र | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री.नंदलाल | अतिरिक्त मुख्य सचिव,नियोजन विभाग |
| २ | श्री.ज.एस.सहानी | प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग |
| ३ | श्री.एस.एस.हुसैन | प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग |
| ४ | श्री.बी.सी.खटुआ | प्रधान सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग |
| ५ | श्री.आर.एन.देशमुख | सह सचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग |
| ६ | श्री.एस.डी.ठाकरे | उप सचिव तथा संचालक,आर.एस.पी.एम.यु. |
| ७ | श्री.प्रविण दराडे | प्रकल्प व्यवस्थापक,जलस्वराज्य प्रकल्प |
| ८ | श्रीमती व्ही.एस.सरदेसाई | राज्य प्रकल्प नियंत्रक, राज्य शिक्षण परिषद,मुंबई. |
| ९ | श्री.एस.पी.जोशी | उप सचिव, शालेय शिक्षण विभाग |
| १० | श्री.एच.के.जाधव | उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग |
| ११ | डॉ.बी.आर.शेंडे | सहसंचालक, आरोग्य,पुणे. |
| १२ | श्री.पी.बी.पाटील | माहिती व जनसंपर्क विभाग |
| १३ | श्री.जी.सी.शर्मा | विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग |
| १४ | श्री.आर.के.सुर्वे | उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग |
| १५ | श्री.ए.डी.सुर्यवंशी | अवर सचिव, नियोजन विभाग |

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग/पापु.०७**

राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनमधील शिखर समितीच्या बुधवार दिनांक ९ जून,२००४ रोजी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील कार्यवाहीचे मुद्दे:

| अ. क्र | बैठकीत घेतलेले निर्णय | निर्णयाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा/अधिकारी | अंमलबजावणी पूर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शिखर समितीवर नेमावयाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील ३ तज्ञांच्या नियुक्तीचा प्रस्ताव स्वतंत्र धारिकेत सादर करुन त्यास शासनाची मान्यता घेण्यात यावी. | उप सचिव व संचालक (सुधारणा सहाय व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | १० जुलै,२००४ |
| २ | राज्य कार्यकारी समितीवर विविध क्षेत्रातील ६ तज्ञ नेमण्याचा प्रस्ताव तयार करुन त्यास शिखर समितीच्या अध्यक्षांची मान्यता घ्यावी व शिखर समितीच्या बैठकीत कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी. | -----"------- | ३० जुलै,२००४ |